## प्र क र ण प हि ले

## आत्मचरित्राचे स्वरूप

### आत्मचरित्र : एक वाङ्मयप्रकार -

आपल्या जीवनातील अनुभव दुस-यांना सांगणे ही मानवाची एक स्वाभाविक प्रवृत्ती आहे. आदिम काळात असे अनुभव ज्यांनी सांगितले त्यातूनच लोक वाङ्मयाची निर्मिती झाली. त्यामुळे लोककथा हा प्राचीन पहिला वाङ्मय प्रकार समजला जातो. कारण अनुभव सांगणारा त्या अनुभवाचे केवळ कथन करीत नव्हता, तर ते कथन "ऐकीव" वाटावे, आकर्षक वाटावे म्हणून तो त्यात कल्पनेचे कांही रंग मिसळून आपले अनुभव सांगत होता. प्राचीन कालातील आदिम अवस्थेतील या लोककथा एका दृष्टीने आत्मचरित्राच्या जवळच्या आहेत. असे म्हटल्यास अतिशयोक्तीचे होऊ नये. या संदर्भात प्रा. मीर इसहाक शेख यांनी म्हटल्याप्रमाणे "............ तो दुसऱ्या व्यक्तीसमोर आपल्या मनातील विचार, भावना व कल्पना अभिव्यक्त करु लागला. अशा अभिव्यक्तीच्या विकासामध्ये कधी कधी त्याला असे जाणवू लागले की, आपल्या मनातील विचार, भावना, कल्पना केवळ व्यक्त करण्यापेक्षा त्या उत्कटत्वाने व सौंदर्यपूर्णरीतीने व्यक्त केल्या तर त्याचा परिणाम अधिक होतो व त्याचा प्रभावही पडतो. ही जाणीव ज्या वेळेस त्यास झाली त्याच वेळेला मानवी जीवनात कला जीवनाचे बीजारोपण झाले."[१] याचा अर्थ वाङ्मयाचा पहिला आविष्कार हा जीवनानुभवातून, आत्माविष्कारातून झाला. आज कथा, कादंबरी, नाटक, काव्य यासारख्या वाङ्मय प्रकारांच्या

मूळाशी लेखकाची जीवनानुभूती हीच प्रमुख प्रेरणा आहे असे आपणास दिसून येते. साहित्याच्या निर्मितीच्या पाठीमागे कोणत्या प्रेरणा असतात या संदर्भात W.H. Hudson यांनी मांडलेले विचार महत्वाचे वाटतात. त्यांनी म्हटले आहे,

"Literature is a vital record of what men have seen in life, what they have experienced of it what they have thought and felt about those aspects of it which have the most immediate and enduring interest for all of us. It is thus fundamentally an expression of life through the medium of language."[2]

याचा अर्थ साहित्याची निर्मिती ही लेखकाच्या जीवनानुभावातून होते. पण असे जीवनानुभाव प्रत्येक माणसाला असतात. म्हणून तो काही लिहीत नाहीत किंवा त्याच्या लेखनाला महत्वही प्राप्त होत नाही. कारण सामान्य व्यक्तींना जीवनानुभाव असतात. परंतु कलात्मक दृष्टी नसते. ती ज्यांना असते त्यांच्याच लेखनाला वाङ्मयीन मूल्ये प्राप्त होतात. अशी माणसे सामान्य माणसापेक्षा वेगळी असतात. ती कर्तृत्ववान असतात. त्याप्रमाणे कलावंतही असतात. त्यामुळे सामान्य व्यक्तीपेक्षा कलावंत

व्यक्ती वेगळी ठरते. त्याच्या ठिकाणी जसे जीवनानुभव असतात त्याप्रमाणे त्या अनुभवांची अभिव्यक्ती करण्याची एक शैली असते. म्हणूनच त्यांनी लेखन स्वरूपात अभिव्यक्त केलेल्या जीवनानुभवाला वाङ्‌मयीन रूप प्राप्त होते. अशा व्यक्ती - कलावंत - का लिहितात ? यासंबंधी W.H.Hudson यांनी मार्मिक विवेचन केले आहे. साहित्याच्या निर्मितीच्या पाठीमागे कोणत्या प्रेरणा असतात हे सांगताना त्यांनी म्हटले आहे - "1) Our desire for self - expression;

2) Our interest in people and their doings;

3) Our interest in the world of reality in which we live, and in the world of imagination which we conjure into existence; & 4) Our love of form as form."3

आपल्या जीवनानुभवाचे चित्रण करताना कांही लेखक केवळ आपल्याच जीवनातील अनुभवाचे चित्रण करतात. तर काही लेखक आपल्याच जीवनातील अनुभवाचे चित्रण न करता बाहय जीवनात म्हणजेच समाज जीवनात ज्या घटना घडतात त्यांचे चित्रण करतात यातूनच १) आत्मनिष्ठ चित्रण आणि २) वस्तुनिष्ठ चित्रण असे दोन प्रकार संभवतात. आत्मनिष्ठ चित्रणातून कथा कादंबरी, नाटक, लघुनिबंध हे वाङ्‌मयप्रकार निर्माण झालेले आहेत. त्यामध्ये आत्मचरित्राला प्रथम स्थान द्यावे लागेल. कारण आत्मचरित्रामध्ये आत्मचरित्र लिहिणारा लेखक आपल्या जीवनातील अनुभवांची अभिव्यक्ती करत असतो. अशी अभिव्यक्ती काही लेखक कथा, कादंबरी, नाटक, लघुनिबंध या

वाङ्मयप्रकारांतूनही करतात. परंतु आत्मचरित्राव्यतिरिक्त इतर वाङ्मय प्रकारांमधून होणाऱ्या अभिव्यक्तीमध्ये तो कलात्मकतेला, सौंदर्यभावनेला, भाषाशैलीला अधिक महत्व देत असतो. त्यात कल्पनाविलासालाही अधिक महत्व असते परंतु आत्मचरित्रामध्ये "केवळ अनुभवाला" महत्व असते. आत्मचरित्रात केवळ सत्यालाच महत्व असते. जीवनाचे यथार्थ चित्रण करणे या प्रेरणेतून त्यांची निर्मिती झालेली असते. आत्मचरित्रात जीवनानुभवाला, त्याच्या सत्यदर्शनाला महत्व असते. परंतु इतर वाङ्मय प्रकारामध्ये अनुभवा इतकेच आविष्कार पद्धतीला म्हणजे कलात्मक सौंदर्याला महत्व असते. आत्मचरित्राव्यतिरिक्त इतर वाङ्मयप्रकारांची काही तंत्रे, वैशिष्टये असतात. कथा, कादंबरी, नाटक, कविता यांना एक वाङ्मयीन घाट असतो. त्यांची काही कालमानानुसार का होईना काही तंत्रे असतात. वैशिष्टये असतात. परंतु आत्मचरित्र हा एक स्वतंत्र आणि मुक्त आविष्कार असल्याने त्याचा घाट(form) नसतो, त्याची तंत्रे नसतात. आत्मचरित्र या वाङ्मय प्रकारात ते लिहिणाऱ्या लेखकाच्या जीवनातील अनुभवाचे चित्रण असल्याने त्यात कथात्मकता असते, नाट्यमयता असते. काव्यमयता असते. त्यामुळे कथा, कादंबरी, नाटक आणि कविता या वाङ्मयप्रकारांचे काही विशेष आत्मचरित्रात आढळत असले तरी त्यापेक्षा आत्मचरित्राचे स्वरूप वेगळे आहे ते पुढील विवेचनातून स्पष्ट होईल.

## आत्मचरित्र आणि चरित्र :

चरित्र लेखन हा एक वाङ्‌मय प्रकार आहे. समाज जीवनात असामान्य कर्तृत्व दाखविणाऱ्या कोणत्याही सामान्य किंवा असामान्य व्यक्तीचे चरित्र लिहिले जाते. अशा लेखन प्रकारात चरित्रनायक आणि चरित्र-लेखक हे दोघे भिन्न असतात. चरित्र - लेखक चरित्र नायकासंबंधी माहिती गोळा करुन त्या आधारे चरित्र लेखन करतो। तर आत्मचरित्रकार हा स्वतःच स्वतःच्या जीवनाचे चित्रण करतो. आत्मचरित्रात चरित्र लेखक आणि चरित्र नायक या दोन्ही व्यक्ती एकच असतात. त्यामुळे चरित्र लेखक ज्या अलिप्ततेने चरित्र लेखन करील ती अलिप्तता आत्मचरित्रात असेलच असे नाही. चरित्र हा जीवनाचा एक पूर्ण आलेख असू शकतो. म्हणजे चरित्रनायकाच्या जन्मापासून मृत्युपर्यंतचे चित्रण त्यात येऊ शकते. परंतु आत्मचरित्रामध्ये चरित्र नायक हा स्वतंत्र निवेदन करीत असल्याने एका विशिष्ट कालखंडाचे चित्रण त्यात येत असते. आणि तो स्वतः निवेदन करीत असल्याने त्यामध्ये आत्मनिष्ठेला अधिक महत्व प्राप्त होते. या उलट चरित्र लेखनामध्ये वस्तुनिष्ठता अधिक असते. तथापि चरित्र व आत्मचरित्र या दोन्हीही वाङ्‌मयप्रकारातील एक महत्वाचे साम्य म्हणजे त्यातील मुख्य नायक हे वास्तवातील असतात. चरित्र आणि आत्मचरित्रामध्ये कल्पनाविलासाला अजिबात महत्व नाही. आत्मचरित्रामध्ये लेखक स्वतःच्या अनुभवाचे कथन

करत असल्यामुळे त्यात जेवढी वास्तवता असते तेवढी चरित्रामध्ये असेलच असे नाही. त्यामुळे चरित्रापेक्षा आत्मचरित्रातून चरित्र नायकाचे अंतरंग अधिक स्पष्ट होते म्हणून Dr.D.G. Naik यांनी म्हटले आहे. "Autobiography is primarily subjective. It is built from within outward. The invisible world within the individual is revealed to the readers and that too by no less an authority than the individual himself. It is therefore, first-hand and direct in formation and no guess-work."[4]

चरित्र आणि आत्मचरित्र यांच्या लेखनाच्या भूमिकाच भिन्न आहेत. चरित्र हे पूर्णतः वस्तुनिष्ठ असते तर आत्मचरित्र पूर्णतः आत्मनिष्ठ असते. अर्थात असेही असू शकते की चरित्र हे चरित्र लेखकामुळे व्यक्तिनिष्ठ असल्याने ते वस्तुनिष्ठ असेलच असे नाही. याउलट एखादे आत्मचरित्र आत्मनिष्ठ असूनही वस्तुनिष्ठ असू शकते. तेव्हा चरित्र आणि आत्मचरित्र हे दोन्ही वाङ्मयप्रकार एकमेकांच्या जवळचे असले तरी त्या लेखन निर्मितीच्या पाठीमागची भूमिका आणि प्रेरणा भिन्न असल्यामुळे दोन्ही वाङ्मयप्रकार आपल्याला भिन्न मानावे लागतील असे सकृतदर्शनी वाटते.

## आत्मचरित्र आणि कादंबरी :

आत्मचरित्र आणि कादंबरी या दोहोंमध्ये मानवी स्वभावाचे आणि जीवनाचे चित्रण केलेले असते. या दोहोंमध्ये विविध प्रसंगांची, घटनांची गुंफण केलेली असते. त्यामुळे ब-याचवेळा एखाद्याचे आत्मचरित्र कादंबरीसारखे उतरते तर एखादी कादंबरी ही आत्मचरित्रासारखी वाटते. चरित्रात्मक कादंबरी हा वाङ्‌मय प्रकार तर आत्मचरित्राला अधिक जवळचा आहे. घटनांचे चित्रण, त्यांची गुंफण, व्यक्तिचित्रण वातावरणनिर्मिती, भाषाशैली, संघर्ष हे घटक दोन्हीमध्ये समान असतात. गंगाधर गाडगीळ यांच्या मते " आत्मचरित्र हे कादंबरीपेक्षा मूलत: भिन्न नाही. फरक इतकाच की आत्मचरित्र ही एक कादंबरी असते आणि त्याच वेळेला एका व्यक्तीच्या जीवनाचा तो इतिहासही असतो. परस्परांशी एकजीव झालेली दोन पुस्तके म्हणजे आत्मचरित्र."[4] कादंबरीमध्ये वास्तवातील व्यक्ती आणि घटना यांचे चित्रण असते त्याची कलात्मक, तंत्रात्मक मांडणी केलेली असते. कादंबरी हा एक आहे. तिचा एक घाट असतो त्यामुळे तिला तंत्राची बंधने लागू होतात. आत्मचरित्राचा असा घाट असत नाही. कादंबरी वाचनीय वाटावी म्हणून मनोरंजक घटना, प्रसंगांची योजना लेखक करतात तसेच कल्पनाविलासाचा आधार घेतात. आत्मचरित्रात तर केवळ वास्तवाला महत्व असते.

कल्पनाविलासाला अजिबात महत्व नसते. वाचकाचे मनोरंजन करणे, कलानिर्मितीचा आनंद घेणे ही कादंबरी लेखनाच्या पाठीशी असणारी प्रेरणा असते तर आत्मचरित्रात केवळ आत्माविष्कार करणे ही प्रमुख प्रेरणा असते. अशा प्रकारे लेखन प्रेरणाच भिन्न असल्याने आत्मचरित्राचे स्वरूप कादंबरीपेक्षा वेगळे ठरते.

आत्मचरित्र आणि इतिहास :

आत्मचरित्र म्हणजे आत्मचरित्र लेखकाच्या जीवनाचा इतिहासच असतो. इतिहासाची वस्तुनिष्ठता, सत्यता, आत्मचरित्रात असते. त्यामुळे आत्मचरित्राचे इतिहासाशी जवळचे नाते आहे. तरीही इतिहासापेक्षा आत्मचरित्राचे स्वरूप वेगळे असते. कारण इतिहासामध्ये इतिहास-लेखक एखादी घटना चित्रित करताना विविध मार्गांनी माहिती मिळवीत असतो आणि वस्तुनिष्ठ चित्रण करीत असतो मात्र आत्मचरित्र लिहिणारा लेखक आपल्या एकाच दृष्टिकोनातून लेखन करीत असतो. त्यामुळे हे लेखन पूर्णत: आत्मनिष्ठ असते. मात्र आत्मचरित्र लिहिणारा लेखक हा सामाजिक, सार्वजनिक जीवनातील घटक असेल तर त्याच्या आत्मचरित्रात समाजजीवनाचे, घटनांचे म्हणजेच इतिहासाचे चित्रण रेखाटले जाते. अनेक आत्मचरित्रे इतिहासकाराला पुरावा म्हणून आधारभूत ठरली आहेत. सामाजिक, राजकीय, वाङ्मयीन क्षेत्रातील व्यक्तींची आत्मचरित्रे ही

केवळ त्यांच्याच जीवनाचे दर्शन घडवितात असे नव्हे तर ते ज्या कालखंडात जन्मले, लहानाचे मोठे झाले आणि कर्तृत्व दाखविले त्या कालखंडाचेही चित्रण त्यांच्या लेखनात अपरिहार्यपणे प्रतिबिंबित होते. काका कालेलकर, आचार्य अत्रे श्री. म. माटे, विश्राम बेडेकर, भालजी पेंढारकर, सूर्यकांत मांढरे यांची आत्मचरित्रे त्या दृष्टीने लक्षणीय ठरतात.

## आत्मचरित्र आणि इतर वाङ्मय प्रकार :

कादंबरीप्रमाणे नाटक, काव्य आणि लघुनिबंध या वाङ्मयप्रकाराशी आत्मचरित्राचा संबंध पोहोचतो. नाटक हे प्रयोगात्मक आणि तंत्रात्मक असल्यामुळे त्याचा आत्मचरित्रांशी फारसा संबंध पोहचत नाही. कांही नाटके चरित्रप्रधान असतात. परंतु त्यात केवळ चरित्रलेखकाचे महत्व असत नाही. शिवाय कल्पनाविलासाचा लेखकाने आधार घेतलेला असतो. आत्मचरित्रामध्ये चरित्र लेखकाचे स्वत: एकट्याचेच निवेदन असते. त्यापेक्षा काव्य हा प्रकार आत्मचरित्राला जवळचा आहे. केशवसुत, बालकवी, भा. रा. तांबे, माधव जूलियन, बा. भ. बोरकर, या सारख्या कवींच्या कविता त्यांच्या जीवनाचे चित्रण करतात. भा. रा. तांबे यांनी तर " माझ्या कवितेची वाढ माझ्या जीवनाच्या संगतीने झाली. (It has grown with my life)"[6]

या शब्दांत स्पष्ट निवेदन केले आहे. ब-याचशा कवींच्या कविता आत्माविष्कारात्मक असतात. एका दृष्टीने ते काव्यात्मक आत्मचरित्रच असते. परंतु आत्मचरित्रामध्ये चरित्र लेखकाच्या जीवनातील सर्व घटना येतात तशा कवितेत येतीलच असे नाही. कारण सर्वच घटना काव्यक्षम होतीलच असे नाही. लघुनिबंधासंबंधी असेच म्हणावे लागेल. श्रीनिवास कुलकर्णी, प्रभाकर पाध्ये, वि. वा. शिरवाडकर यांनी आपल्या जीवनातील काही घटनांच्या आधारे ललित लेख लिहिले आहेत. कारण ललित लेखातून त्यांच्या जीवनाचे चित्रण झाले आहे. परंतु हे चित्रण आत्मचरित्रासारखे संपूर्ण नसून तुटक तुटक असते. त्यामुळे आत्मचरित्राप्रमाणे लेखकाच्या समग्र व्यक्तिमत्वाचे दर्शन घडू शकत नाही.

आत्मचरित्राच्या व्याख्या :

वरील विवेचनावरून असे स्पष्ट होते की आत्मचरित्र हा ललित वाङ्मयाचा एक प्रकार आहे. कथा, कादंबरी, नाटक, ललित निबंध, काव्य या वाङ्मय प्रकारांशी आत्मचरित्राचा कमी-अधिक संबंध असून त्या त्या वाङ्मय प्रकारातील काही वैशिष्ट्ये आत्मचरित्रात आढळून येतात. तरी प्रश्न उरतो की आत्मचरित्र म्हणजे काय ?

या संदर्भात अनेक अभ्यासकांनी आपली मते मांडून आत्मचरित्राची व्याख्या करण्याचा प्रयत्न केला आहे. त्या व्याख्यांमध्ये आपल्याला आत्मचरित्र या वाङ्मय प्रकाराचे स्वरुप कळून येते. श्री. रा. ग. जाधव यांनी आत्मचरित्राची व्याख्या केली आहे, ती अशी - " आपल्या जीवन विषयक अनुभवांचे तदनुषंगाने आपल्या व्यक्तिमत्वाचे स्वत: लेखकाने लेखनरुपाने घडविलेले दर्शन म्हणजे आत्मचरित्र होय "[७] तर वसंत बोरगावकरांनी सांगितलेली सोपी व्याख्या अशी " स्वत:च लिहिलेली स्वत:च्या जीवनाची कहाणी "[८] डॉ. नारायण शर्मा यांनीही याप्रमाणेच व्याख्या केली आहे ती अशी " आत्मकथा की सबसे आसान परिभाषा है "स्व" के जीवन की स्वरचित कथा "[९] तर Encychopedia of Britannica मध्ये आत्मचरित्राचा अर्थ "Autobiography is the account of an individual human life written by the subject himself."[10]

असा दिला आहे. तर डॉ. नाईक यांच्या मते, "Autobiography is its simplest defination is the story to one's life written by oneself."[10]
म्हणजे आत्मचरित्र ही लेखकाने स्वत:च्या जीवनाची स्वत:च सांगितलेली कहाणी असते. अर्थात आत्मचरित्रात लेखक केवळ आपल्या जीवनातील घटनांचे निवेदन करत नसतो तर त्या घटनांचे तटस्थपणाने अवलोकन करीत सिंहावलोकन करीत असतो म्हणून डॉ. सदा कऱ्हाडे यांनी म्हटले आहे

" स्वत:च्या जीवनाचे दूरस्थपणाने, सिंहावलोकन वृत्तीने केलेले अवलोकन आणि त्याविषयीचे प्रांजळ निवेदन म्हणजे आत्मचरित्र होय."[१२] म्हणजे आत्मचरित्रात तटस्थता व प्रांजळपणा या दोन गुणांची आवश्यकता असते. त्यादृष्टीने विमल भालेराव यांनी आत्मचरित्राची आदर्श व्याख्या करताना म्हटले आहे ' स्व' जीवन तटस्थपणे न्याहाळून त्यातून आवश्यक त्या घटनांची निवड करणे, त्याचे प्रांजळ निवेदन व कलात्मक मांडणी यातून "स्व" चित्र रेखाटणे म्हणजे आत्मचरित्र होय"[१३] या व्याख्येत तटस्थता, घटनांची निवड कलात्मक मांडणी या वैशिष्ट्याबरोबर "स्व" चित्रण रेखाटणे हे आत्मचरित्राचे खास वैशिष्ट्य सांगितलेले आहे. आत्मचरित्रामध्ये केवळ घटनांचे कथन महत्वाचे नसून चरित्र लेखकाचे व्यक्तिदर्शन घडणे महत्वाचे असते आत्मचरित्रामध्ये जीवन चित्रणाबरोबर व्यक्तिचित्रण येणे उचित ठरते.

वरील विविध व्याख्या पाहता आपणास आत्मचरित्राची स्वरूप वैशिष्ट्ये दिसून येतात ती अशी -

१) आत्मचरित्र हा एक ललित वाङ्मय प्रकार आहे.

२) आत्मचरित्र हे लेखकाने स्वत:च लिहिलेले असते.

३) आत्मचरित्रातून लेखक आपल्या जीवनातील घटनांचे दर्शन घडवितो.

४) जीवनातील घटनांचे हे केलेले चित्रण तटस्थपणाचे व प्रांजळपणाचे असावे लागते.

५) आत्मचरित्रातून लेखकाच्या व्यक्तिमत्वाचे दर्शन घडावे लागते.

६) आत्मचरित्रात कलात्मक मांडणीही आवश्यक असते.

आत्मचरित्राची वैशिष्ट्ये :

साहित्य निर्मितीच्या पाठीशी ज्या विविध प्रेरणा असतात त्यात पहिली आणि प्रमुख प्रेरणा म्हणजे आत्माविष्कार होय. जीवन जगत असताना लेखकाला आपल्या वैयक्तिक जीवनातले अनुभव किंवा बाह्य जीवनातील अनुभव येतात. अशा अनुभवांची कलात्मक अभिव्यक्ती करण्याची त्याच्या मनात इच्छा निर्माण होते कारण तो संवेदनाशील असतो. त्याला प्रतिभाशक्ती प्राप्त झालेली असते. त्यामुळे अनुभवांचे कलात्मक चित्रण करून तो आपले अनुभव, अनुभवामुळे आपल्या मनातील निर्माण झालेल्या भावना, विचार शब्दांतून व्यक्त करतो म्हणूनच साहित्य समीक्षकांनी सुप्रसिध्द आंग्ल कवी वर्ड्स्वर्थ यांच्या काव्यविषयक विचाराचे महत्व मानले आहे.

Wordsworth ने म्हटले आहे "For all good poetry is the spontaneous overflow of powerful feelings--------."[14]

"उत्स्फूर्त भावनेचा, उत्स्फूर्त उद्रेक म्हणजे काव्य" हे कवितेच्या बाबतीत म्हटले असले तरी सर्वच वाङ्‌मय प्रकारांशी खरे आहे. आत्मचरित्रातून लेखक तशाच प्रकाराचे आत्मानुभूती व्यक्त करीत असतो. अर्थात कवितेप्रमाणे आत्मचरित्र उत्स्फूर्त भावनेतून निर्माण होत नसते. परंतु संवेदनाशील मनाच्या लेखकाला कधीतरी हे आपले सारे जीवन, त्या जीवनातील घटना उत्कटपणाने जाणवायला लागतात. आणि त्या उत्कट जाणिवेतून आत्मचरित्र लेखनाची प्रेरणा मिळते म्हणून सर्वच साहित्य प्रकारांत आत्माविष्कार हे आत्मचरित्राचे खास वैशिष्ट्य होय. W. H. Hudson यांनी साहित्याचे स्वरूप सांगताना जे म्हटले आहे ते आत्मचरित्राच्या बाबतीतही खरे आहे, त्यांनी म्हटले आहे

"A great book is born of the brain and heart of its author; he has put himself into its pages."[15]

म्हणजे साहित्यातून लेखक आपल्या भावनांची आणि विचारांची अभिव्यक्ती करीत असतो या सर्व साहित्य प्रकारांमध्ये आत्मचरित्र हा तर कमालीचा आत्मनिष्ठ वाङ्‌मयप्रकार आहे. आत्मचरित्रात लेखक स्वतःचे जीवन त्या जीवनात आलेले अनुभव यांचे निवेदन करीत असतो, आत्मचरित्रा-पासून आत्माविष्काराची अपेक्षा असते म्हणून आत्मचरित्रात लेखकाने आपल्या जीवनातील सत्यकथन करावे अशी अपेक्षा असते. जीवनात घडलेल्या घटना प्रिय असो की अप्रिय, चांगल्या असो किंवा वाईट परंतु

त्याचे चित्रण त्याने प्रामाणिकपणे केले पाहिजे अशी अपेक्षा असते. ते चित्रण सत्यदर्शी, वस्तुनिष्ठ असावे तरच ते खऱ्या अर्थाने आत्मनिष्ठ होईल अन्यथा अशा घटनांचे लेखकाने रसभरीत, कल्पनाविलासात्मक, भावनात्मक चित्रण केले तर आत्मचरित्राचे कादंबरीत रूपांतर होईल. घडलेल्या घटनांशी एकनिष्ठ राहून चित्रण करणे हे आत्मचरित्र लेखनाचे प्रमुख वैशिष्ट्य मानले जाते. लेखकाने केलेले चित्रण जेवढे सत्यदर्शी, वास्तववादी आणि वस्तुनिष्ठ असेल तेवढी त्या अनुभवांची उंची वाढते म्हणून मर्ढेकरांनी म्हटले आहे, "आत्मनिष्ठा हा वाङ्मय निर्मितीचा आद्यबिंदू तर आहेच पण त्याहीपेक्षा अधिक म्हणजे आत्मनिष्ठेतच वाङ्मयनिर्मितीची परिणती आहे. वाङ्मय निर्मितीची सुरुवात ज्याप्रमाणे आत्मनिष्ठेपासून व्हावयास पाहिजे तसा तिचा शेवटही आत्मनिष्ठेत व्हावयास पाहिजे".[१६]

आत्मचरित्रात आपल्या अनुभवांची अभिव्यक्ती करताना लेखकाने सत्यदर्शन घडवावे म्हणजेच जे जे घडले, जसे घडले ते स्पष्टपणाने सांगावे. ते सांगताना त्यांनी स्वतःची स्तुती करून आणि इतरांची निंदा करून, आपल्या चुका, आपले अपराध, आपले दोष यांची प्रामाणिकपणे कबुली द्यावी. त्यामुळे त्याच्या व्यक्तित्वाला बाधा येत नसून उलट त्याचे व्यक्तित्व निर्मळ बनते. म्हणून तर जागतिक वाङ्मयात महात्मा गांधींच्या "सत्याचे प्रयोग" या आत्मचरित्रास श्रेष्ठ स्थान मिळाले आहे.

अर्थात असे सत्यदर्शन घडविणे अवघड असते कारण सत्य हे तत्व मूळातच सापेक्ष आहे त्यामुळे लेखक आपल्याला जाणवलेले सत्य सांगत असतो असे सत्यदर्शन प्रांजळपणे केले पाहिजे, धीटपणाने केले पाहिजे तसेच संयमानेही केले पाहिजे त्यासाठी लेखकाच्या ठिकाणी तटस्थता असणे आवश्यक असते. आत्मचरित्रात स्वत:बद्दल लिहित असल्यामुळे "स्व" बद्दलची आत्मियता व्यक्त होण्याची शक्यता असते. आत्मचरित्रकाराने "स्व" ची जाणीव विसरून तटस्थ वृत्तीने स्वत:कडे पाहिले पाहिजे. याबद्दल वा. ल. कुलकर्णी यांनी केलेली मीमांसा अर्थपूर्ण आहे. त्यांनी म्हटले आहे ""स्व" पासून स्वत:ला अलिप्त करून "स्व" चे स्वरूप न्याहाळण्यात जो रंगून जाऊ शकतो, त्याचे सम्यक्दर्शन व्हावे. एद्दर्थ धडपड करताना जो दिसतो तोच खरेखुरे आत्मचरित्र लिहू शकतो. आत्मगौरवार्थ, आत्मप्रदर्शनार्थ वा आत्मसमर्थनार्थ लिहिलेले आत्मचरित्र हे आत्मचरित्र होऊच शकत नाही."[१७]

<u>प्रांजळ निवेदन :</u>

आत्मचरित्रकार आत्मचरित्रातून स्वत:ची सुखदु:खे सांगत असतो. ती सुखदु:खे सांगताना आपल्या जीवाच्या जीवलगाकडून हृदयगत बोलून दाखवित असतो. हृदयगत सांगितल्याने त्याला समाधान मिळत असते. परंतु हे हृदयगत सांगताना आत्मप्रौढी अथवा आत्मसमर्थन केले तर ते कलात्मकदृष्ट्या दुय्यम ठरते. आत्मचरित्र म्हणजे "स्व" जीवनाचे प्रांजळ

निवेदन. या प्रांजळ निवेदनासाठी आत्मचरित्रकाराच्या अंगी विनयशीलता, सहृदयता, शालीनता आणि संयमशीलता हे गुण असावे लागतात.

समाजदर्शन :

आत्मचरित्र हे लेखकाचे स्वत:चे चरित्र असले तरी तो ज्या समाजात राहतो, ज्या कालखंडात राहतो त्या काळाचे आणि समाजाचे दर्शन प्रतिबिंबित होते. मनुष्य हा सामाजिक प्राणी असल्याने त्याच्या व्यक्तिमत्वाच्या जडणघडणीत समाजाचा आणि कालखंडाचाही वाटा असतो. कोणत्याही व्यक्तीचे व्यक्तिमत्व स्वयंभू असू शकत नाही ते व्यक्तिमत्व सभोवतालच्या समाजाच्या संस्काराने बनलेले असते. माणूस कितीही आत्मकेंद्रित व एकलकोंडा असला तरी सभोवतालच्या समाजाचे संस्कार त्याच्यावर होत राहतात. समाजाच्या जीवनप्रवाहापासून तो अलिप्त राहू शकत नाही. कलावंताचे व्यक्तिमत्व व जीवन यासंबंधी सांगताना वि. वा. शिरवाडकर यांनी जे म्हटले आहे ते मार्मिक आहे ते म्हणतात - "जीवनाच्या ज्या परिसरात आपण वावरतो त्यापासून साहित्य हे अलग काढता येईल हे शक्य नाही. साहित्यिकाची प्रतिभा कितीही आकाशमार्गी असली तरी त्याचे पाय नव्हे, त्याचं सारचं जीवन पृथ्वीवर टेकलेलं असतं. लेखकाचं व्यक्तित्व हे त्याच्या वाङ्मयाचं अधिष्ठान असतं हे कोणीच नाकारत नाही. परंतु हे व्यक्तित्वसुध्दा

सामान्यत: मानलं जातं, तितकं स्वयंभू आणि स्वतंत्र असत नाही. परिसरातील परिस्थितीचे नानाविध संस्कार त्याच्यावर होत असतात व त्या क्रिया-प्रतिक्रिया त्याला विशिष्ट आकार, विशिष्ट रंग प्राप्त होतो."[१८] हे विधान साहित्यिकाप्रमाणे आत्मचरित्र लेखकालाही लागू होते.

आत्मचरित्रातून समाजदर्शन घडत असते म्हणजे आत्मचरित्र हे सामाजिकच असते असे नाही तर लेखक समाज जीवनाच्या ज्या ज्या क्षेत्रात वावरतो त्या त्या क्षेत्रातील घडामोडींचे, स्थितीगतीचे चित्रण त्यात येत असते. लेखक राजकीय क्षेत्रातील असेल तर राजकारणाचे सामाजिक क्षेत्रात असेल तर समाजकारणाचे, शिक्षण क्षेत्रात असेल तर शिक्षणक्षेत्राचे चित्रण आत्मचरित्रात येत असते. इतकेच नव्हे तर तसे चित्रण यावे ही अपेक्षाही असते. आत्मचरित्र लिहिणाऱ्या व्यक्ती बहुधा कोणत्या तरी क्षेत्रात कर्तृत्व दाखविणाऱ्या असतात. समाजकारण, राजकारण, शिक्षण अशा क्षेत्रात सबंध आयुष्य त्यांनी घालविलेले असते. त्यामुळे त्या त्या क्षेत्रातील त्यांचे अनुभव त्यात्या क्षेत्रातील सुष्ट-दुष्ट प्रवृत्ती, त्या क्षेत्रातील परिवर्तने यांचेही चित्रण त्यात उमटते. प्रस्तुत अभ्यासासाठी निवडलेले भालजी पेंढारकर व सूर्यकांत मांडरे या दोन्ही व्यक्ती चित्रपटसृष्टीतील मान्यवर होत. पेंढारकरांनी दिग्दर्शक म्हणून आणि मांडरे यांनी अभिनेता म्हणून

प्रदीर्घ कालखंडात कार्य केले त्यामुळे त्यांच्या आत्मचरित्रातून त्यांच्या व्यक्तिमत्वाचे जसे चित्रण दिसून येते त्याप्रमाणे मराठी सिनेसृष्टीतील स्थित्यंतरे, प्रवृत्ती आणि विकास यांचेही दर्शन घडते. कला क्षेत्राच्या इतिहासाला कलावंताची आत्मचरित्रे पूरक ठरतात. म्हणून त्यांचे ऐतिहासिक व वाङ्मयीन महत्व असते. एवढेच नव्हेतर अनेक लेखकांची आत्मचरित्रे ही ऐतिहासिक पुरावा म्हणून उपयुक्त ठरलेली दिसून येतात.

घटनांची निवड :

आत्मचरित्रात लेखकाच्या जीवनाची कहाणी असते म्हणून त्याने अगदी जन्मापासून ते आतापर्यंतच्या सर्वच घटनांचे चित्रण केले पाहिजे असे नाही. आपल्या जीवनातील महत्वाच्या घटनांचे कथन तो कोणत्याही पध्दतीने करू शकतो. कालक्रमानेच घटना सांगितल्या पाहिजेत असे नाही. मात्र आपल्या जीवनातील कोणत्या घटना सांगायच्या आणि कोणत्या पध्दतीने सांगायच्या याची निवड लेखकाला करावीच लागते. नाहीतर त्याचे आत्मचरित्र हे केवळ घटनांची जंत्रीच होईल. आणि त्यातून त्याचे व्यक्तिमत्व साकार होणार नाही. शिवाय अशा प्रसंगाचे निवेदन सरस घडेल. आत्मचरित्राचे बरेचसे यश या निवडीवर आणि मांडणीवर अवलंबून आहे. म्हणून अ. म. जोशी यांनी म्हटले आहे - "आपणास स्मरत असलेल्या सर्व गोष्टी ज्यायोगाने आपले व्यक्तित्व स्पष्टपणे उठून दिसेल अशा पध्दतीने लोकांसमोर मांडणे हे आत्मचरित्रकाराचे कर्तव्य होय".[१९]

घटना निवडण्यात ज्याप्रमाणे कौशल्य आहे त्याचप्रमाणे त्यांची मांडणी करण्यातही कौशल्य आहे. आत्मचरित्र वाचत असताना वाचकाच्या मनावर एकात्म संस्कार होण्याची आवश्यकता असते. त्यातून वाचकांना लेखकाच्या व्यक्तिमत्वाचे आणि जीवनाचे पैलू कळावेत आणि त्यातून कोणत्यातरी प्रकारचा संस्कार व्हावा अशी अपेक्षा असते. त्यादृष्टीने आचार्य अत्रे यांचे " मी कसा झालो ?" हे आत्मचरित्र लक्षणीय वाटते घटनांची निवड करण्यात कौशल्य असते तर त्यांची मांडणी करण्यात - अनुभवांची अभिव्यक्ती करण्यात - कल्पकता असते. लेखकातला कलावंत याठिकाणी दिसून येतो म्हणून गंगाधर गाडगीळ यांनी म्हटले आहे - "आत्मचरित्र लिहिताना तो आपल्या जीवनातील घटनांकडे एका विशिष्ट दृष्टीने पाहत असतो त्याची निवड करीत असतो. आणि त्यांची विशिष्ट प्रकारे जुळणीही करीत असतो. आपल्या कल्पनाशक्तीचे संस्कारही त्यावर करीत असतो."[२०] आत्मचरित्राला कलात्मक रूप देण्यात हे मांडणीचे कौशल्य लेखकाला अधिक उपयुक्त ठरते. त्यामुळे नाना फडणवीस, आचार्य अत्रे, श्री. के. क्षीरसागर, विश्राम बेडेकर, यासारख्यांची आत्मचरित्रे ललित वाङ्मयात उत्कृष्ट कलाकृती म्हणून मानली गेली आहेत.

आत्मचरित्र लेखनामागील प्रेरणा :

१) आत्माविष्कार :

आत्माविष्कार ही सर्वच ललित वाङ्‌मयाची प्रेरणा आहे म्हणून W. H. Hudson यांनी म्हटले आहे
"The great impulses behind literature is -------- our desire for self expression."[21]
आत्मचरित्र तर आत्माविष्कारासाठीच लिहिलेले असते यामुळे तर आत्मचरित्राचा अंतर्भाव ललित वाङ्‌मयात केला जातो. आपल्या जीवनातील घटना, सुखदुःखे दुसऱ्यांना सांगावीत त्यात त्यांना सहभागी करुन घ्यावे असे प्रत्येक व्यक्तीला वाटत असते. त्यामुळे व्यक्तीचे मन मोकळे होते. ॲरिस्टॉटलने शोकात्म्याच्या संदर्भात मांडलेला कॅथार्सिसचा सिध्दांत - भावविरेचनाचा सिध्दांत - आत्मचरित्र लेखन प्रेरणेशी अधिक जुळणारा आहे. अशा आत्मविष्कारामध्ये लेखकाचे मन हलके होते, त्याच्या मनाला विरंगुळा मिळतो म्हणून मालतीबाई बेडेकरांनी म्हटले आहे "....... दुःखाच्या व उद्विग्नतेच्या काळात मनाला केवळ विरंगुळा म्हणून मी या माझ्या आयुष्याच्या आठवणी लिहायला घेतल्या. मी लेखन करीत असले की रोजच्या जीवनातल्या सुखदुःखाचा मला काही काळ विसर पडतो हा आजवरचा अनुभव याही वेळी प्रत्ययाला आला. आणि खरोखरच या "सहवास" लेखनाने माझ्या अनिवार दुःखाला विरंगुळा मिळाला."[२२]

सिंधुताई सपकाळ यांनीही असेच उद्‌गार काढले आहेत. त्या म्हणतात - " आजही माझ्या जीवाभावाच्या सख्या मला भूतकाळात घेऊन जातात माझ्याभोवती फेर धरतात. घसा फाटस्तोवर हंबरतात तेंव्हा माझे दुःख बेलगाम बनते आणि वाटतं त्यांनी किती चालायचं निखा-यावर, किती किती खायचे चटके, किती निघायचं जळून आणि पोळून ?"[२३] याच भूमिकेतून मल्लीका अमर शेख यांनी "मला उध्वस्त व्हायचंय" आणि हंसा वाडकर यांनी "सांगत्ये ऐका" हे आत्मचरित्र लिहिले आहे.

२) पुनःप्रत्ययाचा आनंद :

प्रा. ना.सी फडके यांनी प्रतिभासाधान मध्ये ललित वाङ्मयापासून लेखक आणि वाचक या दोघांनाही पुनःप्रत्ययाचा आनंद मिळतो असे म्हटले आहे. जुन्या काळातील आठवणी कितीही दुःखद असल्या तरी त्यांना उजाळा देण्यात एक प्रकारचा आनंदच असतो. आत्मचरित्र लेखनामध्ये लेखकाला याच प्रकारचा आनंद मिळत असतो. वाचकांनाही आत्मचरित्रातील घटना, प्रसंग वाचताना आपल्या जीवनाप्रमाणे इतरांच्याही जीवनात सुखदुःखे आली, यशअपयश आले याची जाणीव होते. प्रा. मीर इसहाक शेख यांनी, 'सिंहावलोकन' करणे ही प्रेरणा मानली आहे ती पुनःप्रत्ययाच्या आनंदाशी जुळणारी आहे असे वाटते अर्थात पुनःप्रत्ययामध्ये अनुभवाचा अनुभव घेणे ही प्रक्रिया

असते तर सिंहावलोकनामध्ये आत्मपरीक्षणाची भूमिका असते. प्रा. शेखा यांनी म्हटले आहे - " गतायुष्याचे सिंहावलोकन करणे हाही माणसाचा एक प्रवृत्तिधर्म असतो. आपल्या गतजीवनाचे सिंहावलोकन करताना तो जुन्या आठवणींची अपरिहार्यपणे उजळणी करतो, व त्याला एक प्रकारचा आनंद वाटतो. सुखद आठवणींना उजाळा देण्याने आनंद वाटतोच, पण दु:खद आठवणीही खूप काळ लोटल्यामुळे सुखादच वाटतात. या आठवणींकडे अलिप्तपणे पाहताना लेखकाला सविकल्प समाधीचा आनंद लुटता येतो."[२४] याचा अर्थ आत्मचरित्र लिहिताना आत्माविष्कार हा जसा हेतू असतो त्याप्रमाणे पुन:प्रत्ययाच्या आनंदाने "आत्मानंद" अनुभवणे हीही आत्मचरित्र लेखनापाठीशी असणारी एक प्रेरणा आहे. सिंहावलोकन करणे आणि त्यातून आनंद मिळविणे हा आत्मचरित्र लेखनाचा हेतू असतो. हे सांगताना प्रसिध्द इतिहासकार गिबन यांनी म्हटले आहे - " वयाच्या बावन्नाव्या वर्षी माझे इतिहासलेखनाचे कार्य संपूर्ण झाल्यामुळे आता रिकाम्या वेळात गतायुष्यावर एकदा दृष्टी टाकण्याची मला इच्छा होत आहे. तसे करण्यात स्वत:च्या मनाचे समाधान हा एकच हेतू आहे व तेच माझे फल आहे."[२५]

३) उद्‌बोधन :

ललित वाङ्‌मयाचे उद्‌बोधन हे प्रयोजन आहे. मम्मटाने "काव्यं यशसे अर्थकृते व्यवहारविदे शिवेतरक्षतये सद्यपरनिर्वृतये कान्तासम्मिततयोपदेशयुजे"[२६] अशी काव्य प्रयोजने सांगितली आहेत. त्यातील व्यवहारज्ञान व उपदेश ही काही लेखकांच्या लेखनाची प्रयोजने असतात. आपल्याला आलेल्या अनुभवाचे इतरांना व्यवहारज्ञान करून द्यावे आणि त्यातून उपदेश करावा अशी ललित लेखकांची इच्छा असते. आत्मचरित्र लिहित असताना कांही आत्मचरित्रकार त्याच भूमिकेतून लेखन करतात. आपल्या जीवनात आलेल्या अनुभवातून इतरांना काही बोध व्हावा त्यातून त्यांना जीवनाचा अर्थ समजावा, प्रेरणा मिळावी अशी काही लेखकाची भूमिका असते आणि त्या भूमिकेतून ते लेखन करतात. याबाबतीत संत साहित्याचे अभ्यासक ल. रा. पांगारकर यांचे उद्‌गार महत्वाचे वाटते. त्यांनी म्हटले आहे "माझ्या चरित्रात कोणासही काही घेण्यासारखे नाही असे मला वाटले असते तर हे चरित्र लिहून प्रसिध्द करण्याचा उद्‌योग मी केला नसता दारिद्र्यात वाढलेल्या पण डोके वर काढू इच्छिणा-या विद्यार्थ्यास काही भारीव वाङ्‌मयकार्य किंवा धर्मकार्य करू पहाणा-या लेखकास व वक्त्यास, परमार्थाची तळमळ वाहणा-या मुमुक्षूस, संसार सुखमय करावा अशी वासना असणा-या संसारिकास या चरित्रापासून काहीतरी

बोध, आनंद व उत्साह मिळेल असा मला भरवसा वाटतो."[२७] महर्षि कर्वे यांच्यासारख्या समाज सुधारकांनी उद्बोधनाच्या भूमिकेतून आत्मचरित्र लिहिले आहे. आत्मचरित्रातून उद्बोधन होते म्हणून त्यादृष्टीने लेखन करण्यास काही हरकत नाही पण हे उद्बोधन, हा उपदेश लेखकाच्या जीवनानुभवांशी संबंधात आलेला असावा आत्मचरित्रात महत्व असते ते जीवनानुभवाला, त्याच्या चित्रणाला, उद्बोधनाला नव्हे. उद्बोधन होणे हा दुय्यम भाग. आपल्याला काही उद्बोधन करावयाचे आहे उपदेश करावयाचा आहे याच भूमिकेतून लेखकाने लिहिले तर त्याचे लेखन "विचारग्रंथ" होईल. जीवनग्रंथ होणार नाही. आपल्या जीवनातील दु:खद प्रसंग, अपयश यांच्या चित्रणाच्या अनुषंगाने लेखकाने काही जीवनभाष्य केले तर, ते समजण्यासारखे आहे. त्याचबरोबर आपल्या हातून घडलेल्या चुका, अपराध, दोष यांचेही प्रांजळपणे चित्रण करून त्याआधारे जीवनभाष्य केले तर आत्मचरित्रातून केलेल्या उपदेशाला काही अर्थ प्राप्त होईल. आत्मचरित्र लेखनामध्ये उपदेशाने, प्रबोधनाने, जीवनभाष्याने अनुभवावर आक्रमण करता कामा नये. केवळ उपदेशावर भर दिल्याने आत्मचरित्रातील कलात्मकतेला बाधा येणे शक्य असते. महर्षि कर्वे, स्वातंत्र्यवीर सावरकर, हिटलर, मुसोलिनी यासारख्या लेखकांनी आपल्या चरित्रातून शैक्षणिक व राजकीय सिध्दांत, तत्वज्ञान, मांडण्याचा प्रयत्न केला त्यामुळे त्याचे लेखन कांहीसे सदोष झाले आहे.

दोषांचे परिमार्जन :

आत्मचरित्रामध्ये लेखक आपल्या हातून घडलेल्या चुका, अपराध, गैरकृत्य यांचे चित्रण करून "दोषांची कबुली" देत असतो. त्यामुळे त्यांच्या मनावरील भार हलका होतो आणि त्याला आत्मिक समाधान मिळते म्हणून तर फ्रेंच लेखक रूसो याने आपल्या आत्मचरित्राला "कन्फेशन्स" (कबुलीजबाब) असे नांव देऊन म्हटले आहे की, "जेव्हा मला देवाघरचे बोलावणे येईल तेंव्हा मी हे माझे आत्मचरित्र ईश्वरासमोर ठेवीन आणि म्हणेन की देवा मी अशा अशा तऱ्हेने जगात वागलो आहे. माझी पुण्यकृत्ये व पापे मी प्रामाणिकपणे तुझ्यासमोर ठेवीत आहे."[२८] आपल्या चुका प्रामाणिकपणे कबूल केल्यामुळे आत्मचरित्राच्या लेखनाला महत्त्व प्राप्त होते. हे रूसो आणि म. गांधी यांच्या आत्मचरित्रावरून दिसून येते.

दोषांची कबुली देण्याप्रमाणे गैरसमज दूर करणे हाही आत्मचरित्र लेखनापाठीमागचा हेतू असू शकतो. सार्वजनिक क्षेत्रात काम करणाऱ्या व्यक्तीविषयी समाजामध्ये अनेक गैरसमज असतात. स्वत:बद्दलचे हे गैरसमज दूर करावेत म्हणून ग. वा. बेहरे, आनंद साधले, आनंदीबाई शिर्के या लेखकांनी आत्मचरित्रे लिहिली आहेत. विशेषत: आनंदीबाई विजापुरे यांचे "अजुनि चालतेचि वाट" आणि त्याला उत्तर म्हणून लिहिलेले ग. वा. बेहरे यांचे "आनंदयात्री" ही आत्मचरित्रे वैशिष्ट्यपूर्ण आहेत.

आपल्यासंबंधीचे गैरसमज दूर व्हावेत, आपली भूमिका समजावी आणि त्यातून आपली प्रतिमा स्वच्छ व्हावी ही भूमिका बाळगूनही काही लेखक लिहितात.

समारोप :

अशा प्रकारे आत्माविष्कार करणे, उद्‌बोधन करणे, दोषांची कबुली देणे, आत्मसमर्थन करणे, आत्मपरीक्षण करणे, आत्मानंद मिळविणे अशा विविध भूमिकांतून लेखक आत्मचरित्र लिहितात. लेखकानुसार आत्मचरित्राच्या प्रेरणा वेगवेगळ्या आणि भिन्न असू शकतात. आत्मचरित्राच्या पाठीमागे अमूक प्रेरणा हवी असे आपणास म्हणता येणार नाही. आपणास असे म्हणावे लागेल की, आत्मचरित्र लिहित असताना लेखकाने कोणत्या भूमिकेपासून लिहिले आहे आणि त्या भूमिकेला सुसंगत असा न्याय दिला आहे काय ? असा विचार करणे योग्य ठरेल. कोणत्या तरी एका विशिष्ट भूमिकेतून आपल्या जीवनानुभवाचे लेखकाने तटस्थपणे, प्रांजळपणे आणि कलात्मकतेने निवेदन करावे अशी आपणास अपेक्षा बाळगली पाहिजे आणि त्यादृष्टीने आत्मचरित्राचे गुणदोष पाहणे उचित ठरेल. तथापि आत्मचरित्राच्या पाठीशी कशा प्रकारची प्रेरणा असावी यासंबंधी प्रा. गंगाधर गाडगीळ यांनी व्यक्त केलेले मत संयुक्तिक वाटते त्यांनी म्हटले आहे - " आपल्या सा-या स्मृतिस्थ अनुभवांना सजीव करून त्यांची

स्पंदणारी प्रतिती घेणे त्याचा आकार जाणिवेने उमटविणे, त्यांच्याकडे एका वेगळ्या कुतूहलाने आणि म्हणूनच तटस्थतेने पाहणे आपल्या अनुभवांना संकेतरूप देऊन स्वतंत्र अस्तित्व प्राप्त करून देणे. अशा प्रकारे त्यांना अजर आणि अमर करणे."[२९] हे हेतू आत्मचरित्र लेखनाद्वारे सांगता येतात.

मराठीतील आत्मचरित्रांचा परामर्श :

मराठी वाङ्मयाच्या इतिहासातील आंग्लपूर्व प्राचीन कालखंडात नाना फडणवीस, गंगाधर शास्त्री पटवर्धन, दादोबा पांडुरंग, बाबा पद्मनजी, गोडसे भटजी इत्यादी लेखकांची आत्मकथनात्मक चरित्रे आढळतात. आत्मचरित्र लेखन प्रकाराला खरी सुरुवात मात्र आंग्लकारातच झाली. विशेषत: शिक्षणाचा प्रसार झाल्यानंतर लेखकांची आणि वाचकांची संख्या वाढली आणि विविध वाङ्मप्रकार विकसित होऊ लागले. त्यातूनच १९२० नंतरच्या कालखंडात आत्मचरित्र लेखनाला सुरुवात झालेली दिसते.

पहिला कालखंड : १८८५ ते १९२० :

या कालखंडात स्त्री आणि पुरुष लेखकांची आत्मचरित्रे आढळतात. रमाबाई रानडे (आमच्या आयुष्यातील कांही आठवणी १९१०), महर्षि धोंडो केशव कर्वे (आत्मवृत्त १९१५), अं. ता. काळे (आत्मवृत्त १९१७), ग.भि. बैताडे (माझे टिपणे १९१६), गो. व्यं. पानंदीकर (माझ्या काही आठवणी १९२२), जगन्नाथरावजी टूल्लू (वनाचे उपवन (१९१९), सीताराम गणेश देवधर, आचार्य कालगटकर अशा स्त्री-पुरुषांची उल्लेखनीय आत्मचरित्रे आढळतात.

दुसरा कालखंड १९२० ते १९५० :

या कालखंडात मात्र आत्मचरित्रे विपुल प्रमाणात लिहिलेली दिसतात. त्यातील वैशिष्ट्यपूर्ण आत्मचरित्र लिहिणारे लेखक म्हणजे लक्ष्मीबाई टिळक (स्मृतिचित्रे १९३४-१९३६), पार्वतीबाई आठवले (माझी कहाणी १९२८), आनंदीबाई कर्वे (माझे पुराण १९४४), कमलाबाई देशपांडे (स्मरणसाखळी १९४३), लिलाबाई पटवर्धन (आमची अकरा वर्षे १९४५) या लेखिका होत. स्त्रियांच्या या आत्मचरित्रातून त्यांच्या संसारिक जीवनाचे अधिक चित्रण आलेले आहे आणि त्याचबरोबर तत्कालिन समाज जीवनाचे प्रतिबिंबही उमटले आहे.

याच कालखंडात ल. रा. पांगारकर (चरित्रचंद्र १९३८), न. चि. केळकर (गतगोष्टी १९३८), सी. ग. देवधर (जीवनवृत्तांत १९३७), माधवराव बागल (बंधनात १९३८), पंडित भाऊशास्त्री वझे (माझा चित्रपट व संपूर्ण काशीचा इतिहास १९३९), धर्मानंद कोसंबी (निवेदन १९२४), गो. स. टेंबे (माझा संगीत व्यासंग आणि माझा जीवनविहार १९४८), ना. गो. बोडस (माझी भूमिका १९४०), कर्मवीर वि. रा. शिंदे (माझ्या आठवणी व अनुभव १९४०), ना. गो. चापेकर (जीवनकथा १९४३), गोविंदराव देसाई (गोविंदाची गुजगोष्ट १९४४), ग. त्र्यं. माडखोलकर (दोन तपे १९४६, एका निर्वासिताची कहाणी १९४९),

काका कालेलकर (स्मरणयात्रा १९४९), ना. सी. फडके (माझ्या साहित्य सेवेतील स्मृती), भा. वि. वरेरकर (माझा नाट्य संसार) या लेखकांची वैशिष्ट्पूर्ण आत्मचरित्रे आढळतात. या कालखंडाचे एक वैशिष्ट्यपूर्ण लक्षण म्हणजे संगीत, साहित्य, नाट्य या कलाक्षेत्रातील लोकांनी आत्मचरित्रे लिहिण्यास सुरुवात केली. परंतु या कालखंडात चित्रपट क्षेत्रातील कलावंतांची आत्मचरित्रे फारशी आढळत नाहीत. याचे कारण कदाचित असे असावे की, चित्रपट सृष्टीला १९१२ मध्ये सुरुवात झाली. पहिला मूकपट "भक्त पुंडलिक" हा १९१२ मध्ये प्रदर्शित झाला आणि १९३१ मध्ये "आलम आरा" हा पहिला बोलपट प्रदर्शित झाला. या काळात कलावंत घडत होते विशेषत: चित्रपट सृष्टीचा आरंभ मूकपटाने झाल्याने अभिनयाला संवादापेक्षा जास्त महत्व प्राप्त झाले. परंतु १९३१ साली बोलपट सुरु झाल्यानंतर ख-या अर्थाने चित्रपट युग अवतरले. अशा या कालखंडात मूकपट व बोलपट यामधून काम करणा-या कलावंतांनी नंतरच्या कालखंडात आपली आत्मचरित्रे लिहायला सुरुवात केली असे दिसून येते. मात्र १९२९ ते १९४५ या कालखंडात संगीत क्षेत्रातील गो.स. टेंबे (१९४८), ग. गो. बोडस (१९४०), गोविंदराव देसाई (१९४०) नाट्य क्षेत्रातील भा. वि. वरेरकर यांची आत्मचरित्रे प्रकाशित झाली. आणि १९४०-४५ च्या कालखंडात कलावंतांच्या आत्मचरित्राचा पाया घातला गेला.

तिसरा कालखंड : (१९५० ते पुढे) :

या कालखंडात शेकडोंनी आत्मचरित्रे प्रकाशित झाली. जीवनाच्या विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केलेल्या व्यक्तींनी आत्मचरित्रे लिहिली. तसेच चित्रपटसृष्टीतील कलावंतांनी आत्मचरित्रे लिहून आत्मचरित्र हा वाङ्मय प्रकार समृध्द करण्याचा प्रयत्न केला. त्यातील प्रमुख आत्मचरित्रे म्हणजे चित्र आणि चरित्र (बाबूराव पेंढारकर), स्नेहांकिता (स्नेहप्रभा प्रधान) एक झाड दोन पक्षी (विश्राम बेडेकर), सांगत्ये ऐका (हंसा वाडकर), अशी मी जयश्री (जयश्री गडकर), पाऊलखुणा (गजानन जहागीरदार), शांतारामा (व्ही. शांताराम), मी दुर्गा खोटे (दुर्गा खोटे) स्वरवंदना (ज्योत्स्नाबाई भोळे), झाले मृगजळ आता जलमय (दत्ता भट), अनंत आठवणी (अनंत माने), चंदेरी दुनियेत (लीला चिटणीस) ही होत. सिनेकलावंतांनी ही आत्मचरित्रे लिहून व्यक्तिजीवनाचे दर्शन घडविले आहेच पण त्याचबरोबर चित्रपट सृष्टीतील विविध अंगांचे, अंतरंगाचे चित्रण घडवून मराठी वाचकांसमोर चित्रपट सृष्टीचा इतिहास ठेवला आहे. त्यादृष्टीने भालजी पेंढारकर यांचे आत्मचरित्र (साधा माणूस) अत्यंत महत्वाचे आहे कारण जवळजवळ ७० वर्षांच्या प्रदीर्घ कालखंडाचे दर्शन त्यातून घडते कारण या कालखंडातील सर्वात जास्त चित्रपट आणि उत्कृष्ट चित्रपट त्यांचेच असल्याने त्यांच्या आत्मकथनाला

महत्त्व प्राप्त झाले आहे. असेच महत्व श्री. सूर्यकांत मांडरे यांच्या "झाकडी पाती" या आत्मचरित्राला प्राप्त झाले आहे. कारण त्यांचाही चित्रपटसृष्टीचा कालखंड मोठा आहे. मराठीत गाजलेल्या अनेक चित्रपटांतून त्यांनी भूमिका केल्याने आणि त्या भूमिका गाजल्याने त्यांच्या आत्मचरित्रातून चित्रपट सृष्टीतील अनेक सुष्ट-दुष्ट प्रवृत्तींचे तसेच एका अभिनेत्याच्या कलाविकासाचे चित्रण त्यात आढळते. विशेषत: कलावंत म्हणून जीवन जगत असताना कौटुंबिक जीवनात कसे ताण-तणाव निर्माण होतात, "कलावंत" जपताना "माणूस" या प्राण्याची कशी ससेहोलपट होती, याचे वैशिष्ट्यपूर्ण चित्रण त्यांच्या आत्मकथनातून प्रतित होते. एका श्रेष्ठ दिग्दर्शकाने लिहिलेले "साधा माणूस" आणि एका श्रेष्ठ अभिनेत्याने लिहिलेले "धाकटी पाती" ही दोन आत्मचरित्रे केवळ चित्रपट कलासृष्टीचीच नव्हे तर मराठी साहित्याची गौरवास्पद भूषणे आहेत असे म्हटल्यास ते अतिशयोक्तिचे होऊ नये म्हणून या दोन श्रेष्ठ कलावंताच्या अंतरंगाचा अभ्यासाच्या दृष्टिकोनातून शोध घेणे आनंददायक व आव्हानात्मक वाटते.

—o—

## संदर्भ आणि टीपा


| | |
|---|---|
| १) शेख मीर इसहाक | लक्ष्मीबाई टिळकांची स्मृतिचित्रे : एक चिंतन प्रतिमा प्रकाशन, पुणे १९८७ पृ. ९ |
| २) Hudson W. H. | An Introduction to the Study of Literature. Lyall Book Depot, Ludhiana. 2nd Indian Edition 1968 Page 10 |
| ३) Hudson W. H. | तत्रैव पृ. ११ |
| ४) Naik D. G. | Art of Autobiography Vidarbha Marathwada Company, Poona 1962. Page 106 |
| ५) गाडगीळ गंगाधर | साहित्याचे मानदंड पॉप्युलर प्रकाशन, मुंबई. १९६२ पृ.७१ |
| ६) तावडे भा. रा. | मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड ५ भाग १ मराठी साहित्य परिषद, पुणे. पृ.३२३ |
| ७) जोशी लक्ष्मणशास्त्री (संपादक) | मराठी विश्वकोश, खंड दुसरा १९७६ पृ.११ |
| ८) बोरगांवकर वसंत | प्राचीन मराठीतील चरित्रलेखन कॉन्टीनेन्टल प्रकाशन, पुणे. १९७८ पृ.२९८ |

९) शर्मा नारायण — हिंदी आत्मकथा
पुस्तक संस्थान, कानपूर १९७८ पृ. ३७

१०) Encyclopaedia Britannica Vol. 2 — Encyclopaedia Britannica Ltd.
William Benton,
Publisher, London, 1968
Page 854

११) Naik D. G. — Art of Autobiograpjy
Vidarbha Marathwada Company,
Poona 1962 Page. 13

१२) कऱ्हाडे सदा — चरित्र आणि आत्मचरित्र
लोकवाङ्मयगृह प्रा. लि. मुंबई १९७६
पृ. १०१

१३) भालेराव विमल — आधुनिक मराठी वाङ्मयातील स्त्रियांची
आत्मचरित्रे : एक अभ्यास
साहित्य प्रसार केंद्र. नागपूर. पृ. १६

१४) Wordsworth Williom — 'Preface to Lyrical Ballads'
English Critical Texts
Third Edition 1979. Page 165

१५) Hudson W. H. — उनि. पृ. १५.

१६) मर्ढेकर बा. सी. — सौंदर्य आणि साहित्य
मौज प्रकाशन, मुंबई, तिसरी आवृत्ती १९७५
पृ. १४६

१७) कुलकर्णी वा.ल. — वाङ्मयीन टीपा आणि टिप्पणी
पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.
तिसरी आवृत्ती १९७० पृ. १०९

१८) शिरवाडकर वि.वा. — अध्यक्षीय भाषण मुंबई उपनगर.
मराठी साहित्य संमेलन १४ वे १९५६
वीणा मे १९६४ पृ. ३१

१९) जोशी अ.म. व माचवे प्र.ब. — चरित्र, आत्मचरित्र आणि टीका
सुविचार प्रकाशन मंडळ, नागपूर १९४२
पृ. १२४.

२०) गाडगीळ गंगाधर — उनि. पृ. ७१

२१) Hudson W. H. — उनि. पृ. ११

२२) बेडेकर मालतीबाई — माझे आत्मचरित्र आणि मी
ललित दिवाळी अंक. नोव्हें. डिसें. १९८१
पृ. ४८

२३) सपकाळ सिंधूताई — प्रस्तावना - मी वनवासी
विंध्य सातपुडा संघर्ष समिती
दुसरी आवृत्ती - १९९०

२४) शेख मीर इस्हाक — उनि॰ पृ॰ १६

२५) जोशी अ॰म॰ व माचवे प्र॰ब॰ — चरित्र, आत्मचरित्र आणि टीका
सुविचार प्रकाशन मंडळ, नागपूर १९४२
पृ॰ १४७ वरून गिबनचे मत उद्धृत॰

२६) जोग रा॰ श्री॰ — अभिनव काव्य प्रकाश
पृ॰ ३२ वरून मम्मटाचा श्लोक उद्धृत

२७) जोशी अ॰म॰ व माचवे प्र॰ब॰ — उनि॰ पृ॰ १०६

२८) जोशी अ॰म॰ व माचवे प्र॰ब॰ — उनि॰ पृ॰ १०६

२९) गाडगीळ गंगाधर — साहित्याचे मानदंड
पॉप्युलर प्रकाशन, मुंबई १९६२
पृ॰ ६८ ते ६९


—o—